गृह (परिवहन) विभागामध्ये ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
गृह (परिवहन) विभाग
शासन निर्णय क्रमांक - एम व्ही डी १२१२/प्र.क्र. ७४/ परि ४
मदाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक - ०१ जानेवारी, २०१६.

वाचा -

१) महिती तंत्रज्ञान संचालनालयाचा शासन निर्णय क्र. GAD- मातंस ०८०/४/२०१४-०/० Directorate of IT (MH) दि. ०१/०७/२०१४.

शासन निर्णय -

माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करुन शासकीय कामकाजात गतिमानता व पारदर्शकता आणणे तसेच शासनाच्या विविध सेवा इंटरनेटव्दारे / ऑनलाईन पध्दतीने जनतेस उपलब्ध करुन देणे हे शासनाचे धोरण आहे. सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त संदर्भाधिन दिनांक ०१/०७/२०१४ च्या शासन निर्णयान्वये ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी विभागांना सल्ला देण्यासाठी पाच संस्थांची निवड केली आहे. सदर पाच संस्थांना गृह (परिवहन) विभागामध्ये दिनांक २४/११/२०१५ रोजी सादरीकरणासाठी आमंत्रित करण्यात आले होते. त्यानुसार पाच पैकी ॲक्सेंचर प्रा.लि. ही संस्था वगळता अन्य चार संस्थांनी ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यासाठी गृह (परिवहन) विभागाचे अपर मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीसमोर सादरीकरण करण्यात आले होते. सदर सादरीकरण विचारात घेऊन गृह (परिवहन) विभागासाठी दिनांक ०१ डिसेंबर, २०१५ पासून खालीलप्रमाणे सल्लागार नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. मे. के पी एम जी प्रा. लि. यांची गृह (परिवहन) विभागासाठी पुढील एक वर्षाच्या कालावधीसाठी ई-गव्हर्नन्स प्रकल्पासाठी सल्लागार म्हणून नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात येत आहे. गृह (परिवहन) विभागाचा कामाचा व्याप विचारात घेता दोन पूर्ण वेळ सल्लागार आणि एक वरिष्ठ सल्लागार नियुक्त करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. गृह (परिवहन) विभागाने ई-गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत कामाची व्याप्ती (Scope of Work) निश्चित केली आहे. यामध्ये सेवा हमी कायद्यांतर्गत या विभागाद्वारे देण्यात येणा-या सेवा ऑनलाईन

स्वरुपात उपलब्ध करुन देणे तसेच राज्य शासनाच्या इतर विभागांशी या विभागातील माहिती अदान प्रदान करणेबाबत सुविधा उपलब्ध करुन देण्याचा समावेश कामाची व्याप्तीमध्ये करण्यात येत आहे.

४. सदर सल्लागारांना माहिती व तंत्रज्ञान विभागाने विहित केल्यानुसार मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यासाठी येणारा खर्च मागणी क्र. बी- ३, २०४१ वाहनावरील कर, (००) ००१ संचालन व प्रशासन, (०१) परिवहन आयुक्त, (०१) (०४) कार्यालयीन अभिलेखांचे संगणकीकरण (मोटार वाहन आणि मोटार अपघात दावा न्यायाधिकरण) (२०४१ ०२९७) या लेखाशिर्षाखालील तरतूदीमधून भागविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०१०११६०५४४३५२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Prakash K Sabale

Digitally signed by Prakash K Sabale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Prakash K Sabale
Date: 2016.01.01 16:47:29 +05'30'

(प्रकाश साबळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री / राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
२) परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर.
४) सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय.
५) सर्व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन कार्यालय.
६) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
७) निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
८) निवड नस्ती / परिवहन -४.